Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000,www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ - २६०९०९१, २६०९१३५

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/KOP/२०२४-२५/ No - 1450 दि. 25 APR 2024

प्रति,

| | |
|---|---|
| १. डॉ. पी. एम. गुरव (अध्यक्ष)<br>सुक्ष्मजीवशास्त्र अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.<br>फोन नं. - ०२३१-२६०९३२६<br>मो. नं. - ९६२३६१९६१९ | २. डॉ. बी. एन. कांबळे (सदस्य)<br>व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी<br>मो. नं. - ९४२२५९०२८७ |
| ३. डॉ. रणधिर शिंदे (सदस्य)<br>मराठी अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>फोन नं. - ०२३२५ २५४८२३<br>मो. नं. - ९५५२९५९९२० / 9890913031 | २. डॉ. कविता गाजरे (सदस्य)<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर<br>मो. न. -९८६००८६८१६ |

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालील संलग्नीकरण प्रकाराच्या मान्यतेसाठी संलग्नीत महाविद्यालये / संस्थांकडून प्राप्त प्रस्तावान्वये नियुक्त स्थानिक चौकशी समितीबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या महाविद्यालय / संस्थेच्या नावासमोर उल्लेखित प्रस्तावासंदर्भात चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११४ व ११५ नुसार आपली स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

| संस्था/महाविद्यालयाचे नाव व दुरध्वनी क्रमांक | संलग्नीकरण प्रकार | पाठयक्रम / अभ्यासक्रम इ. |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, जि.कोल्हापूर.<br>फोन नं. - ०२३२८ २२४०४१<br>मो.नं. - ९९२१९४७०१३ | नुतनीकरण | बी.एस्सी. भाग १ व २ - बायोकेमिस्ट्री<br>बी.एस्सी. भाग १, २ व ३ - इंडस्ट्रियल मायक्रोबायोलॉजी<br>बी.ए. भाग १, २ व ३ - राज्यशास्त्र<br>बी.एस्सी. भाग १ - अतिरिक्त तुकडी क्र. १ व २<br>बी.एस्सी. भाग २ - अतिरिक्त तुकडी क्र. १<br>बी.एस्सी. भाग ३ - अतिरिक्त तुकडी क्र. १<br>एम.एस्सी. भाग १ व २ - प्राणिशास्त्र (२०), गणित (५०)<br>एम.ए. भाग १ व २ - मराठी (५०), इतिहास (५०), अर्थशास्त्र (५०)<br>एम.एस्सी. भाग १ व २ - ॲनॅलिटिकल केमिस्ट्री<br>C.O.C.- B.A.- 1.Certificate Course in Tourism<br>2. Certificate Course in Art Translation<br>3. Certificate Course in Fashion Designing<br>C.O.C.-B.Com. 1.Certificate Course in Banking<br>2. Certificate Course in Insurance<br>3. Certificate Course in Retailing<br>C.O.C.-B.Sc.- 1. Certificate Course in Information & Computer Technology<br>2. Certificate Course in Bio-Technology<br>3. Certificate Course in Sericulture |

कृपया या पत्राच्या तारखेपासून **सात दिवसातील तारीख समिती अध्यक्षांनी स्वत: निश्चित करून** ती सर्व सदस्य व संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवावी व समितीचा चौकशी अहवाल महाविद्यालयास भेट दिलेल्या तारखेस आपल्या प्रवासभत्ता-दैनंदिनभत्ता यांच्या देयकांसह विद्यापीठ कार्यालयास सादर करावा अशी विनंती आहे. या अंमलबजावणीवर पुढील कार्यवाही अवलंबून असल्याने तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रस्तावास अनुसरुन करावयाच्या कार्यवाहीच्या संदर्भात समिती सदस्यांनी कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

....२



Scanned with ACE Scanner

१. समितीने महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय/पाठ्यक्रम/विद्याशाखा/तुकड्या यांना शासन मान्यता व विद्यापीठ मान्यता आहे की नाही याची शहानिशा करुन वस्तुस्थितीजन्य माहिती अहवालात नमूद करावी.

२. नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारासाठी अर्ज करणाऱ्या महाविद्यालयांनी आवश्यक बाबींची सिध्दता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११४ व ११५ मधील पोटकलमांना अनुसरुन करावयाची आहे व संलग्नीकरणाच्या संबंधित अर्जाप्रमाणे पाहणी करुन समितीने आपला अहवाल सादर करावयाचा आहे.

३. संबंधित महाविद्यालयास विद्यापीठाने परीक्षा केंद्र मंजूर केले असल्यास त्यासाठी आवश्यक त्या सोयी महाविद्यालयाने उपलब्ध केलेल्या आहेत किंवा नाहीत याची समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतच्या नोंदी व निरीक्षणांचीही अहवालात नोंद करावी.

४. स्थानिक चौकशी समिती अहवालामध्ये नमुद केलेल्या सूचनांचे महाविद्यालयाचे प्राचार्य व समिती सदस्यांनी अवलोकन करुन योग्य ती कार्यवाही करावी.

५. स्थानिक चौकशी समितीस स्वयंमुल्यांकन अहवाल व अनुषंगिक कागदपत्रांची सी.डी. समितीच्या प्रत्यक्ष भेटीदरम्यान महाविद्यालयामध्ये प्राप्त होईल. त्यासमयी समितीने स्वयंमुल्यांकन अहवाल व प्रत्यक्ष कागदपत्रे पाहून स्थानिक चौकशीकरिता राखून ठेवलेल्या रकान्यामध्ये गुणांकन करावयाचे आहे. यानंतर अध्यक्षांसह सर्व समिती सदस्यांच्या योग्य त्या शिफारशी व स्वाक्षरीसह तसेच संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह अहवालामधील प्रपत्र अ, ब, क व सीडी विद्यापीठ कार्यालयाकडे सादर करावी. इतर कोणतीही अधिकची कागदपत्रे समितीने कार्यालयास सादर करु नयेत. अहवाल सादर करण्यापूर्वी सदरचा अहवाल कार्यालयामध्ये तपासून घ्यावा.

६. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रस्ताव प्रकारानुसार (नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार) समितीने आपला अहवाल शिफारशीसह विद्यापीठाकडे सादर करावा.

७. समितीमधील अध्यक्ष अथवा सदस्य सदर समितीवर काम करण्यास असमर्थ असतील तर संबंधितांनी विद्यापीठ कार्यालयास याबाबत सकारण पत्राद्वारे/ई-मेलद्वारे पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसात कळविणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेऊन समिती अध्यक्षांनी निश्चित केलेल्या तारखांना संबंधित महाविद्यालयांना भेटी देऊन अहवाल सत्वर विद्यापीठाकडे पाठवून सहकार्य करावे अशी पुन:श्च विनंती करण्यात येत आहे.

टिप - १. समिती सदस्यांना सदर प्रवासासाठी वाहन वापरण्यास मा.कुलगुरु यांनी परवानगी दिली आहे. तथापि, सदस्यांनी वाहनाचा वापर एकत्रितपणे करण्याबाबत सतर्क रहावे. मा.सदस्यांनी समितीच्या कामकाजास्तव मोटार वाहन वापरले असल्यास टोल द्यावा लागणाऱ्या मार्गावरील टोल पावत्या बीलासोबत सादर करणे आवश्यक आहे. टोल पावत्या सादर न केल्यास एस.टी. च्या दरपत्रकानुसार देयके आदा करण्यात येतील. याबाबत पुन:श्च सूचित करण्यात येणार नाही. तसेच चुकीच्या नमुन्यात प्रवासभत्ता व दैनंदिन भत्ता देयके सादर केल्यास अशी देयके मंजूर होणार नाहीत. प्रवासभत्ता व दैनंदिन भत्ता देयके कोणत्याही परिस्थितीत अहवालासोबतच सादर करावीत.

२. मा.अध्यक्षांसह समिती सदस्यांनी आपली प्रवासभत्ता व दैनंदिन भत्ता देयके (अध्यक्षांच्या स्वाक्षरीने) एकत्रित पाठवावीत. तसेच आपल्या बिलावर ग्रेड पे, मोबाईल नंबर, बँकेचे नाव, पत्ता, संपूर्ण खाते क्रमांक व IFSC कोड न चुकता नमूद करावा. अपूर्ण देयकांवर लेखा विभागामार्फत कार्यवाही होत नाही याची नोंद घ्यावी.

३. इतर मुख्य अभ्यासक्रम वगळता केवळ करिअर ओरिएंटेड कोर्सबाबत (C.O.C.) तसेच बी.व्होक. अभ्यासक्रमांबाबत भेट देणाऱ्या स्थानिक चौकशी समितीची देयके महाविद्यालयाने स्विकारुन विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयाच्या निधीतून आदा करावीत.

४. उपरोक्त नमुद अभ्यासक्रमामध्ये नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार साठी आपल्या महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव बरोबर आहेत काय याची खात्री करण्यात यावी. तसेच ऑफलाईन दिलेले व ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावांची नोंद पत्रामध्ये नमूद नसल्यास उपरोक्त समिती भेट देण्याच्या आधी विभागाशी संपर्क साधण्यात यावा.

कळावे,

आपला विश्वासू

PSPandv

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

प्रत : १. मा.प्राचार्य, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, जि.कोल्हापूर.

- यांना विनंती करण्यात येते की, समिती अध्यक्षांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वत: उपस्थित राहावे. तसेच महाविद्यालयातील सर्व संबंधिताना भेटीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत सूचना द्याव्यात.

या अनुषंगाने नियुक्त समितीस त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत व समितीस योग्य ते सहकार्य करावे.

तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर **AFFILIATION ➔ AFFILIATION T-2 INFORMATION LISTS ➔ POINT BASE FINAL LOCAL INQUIRY COMMITTEE REPORTS FORMATS** या लिंकवरील महाविद्यालयाच्या प्रस्तावानुसार लागू असणाऱ्या अहवालाच्या नमुन्याची प्रत, स्वयंमुल्यांकनाची प्रत तसेच तत्सम कागदपत्रांची फाईल समितीस पुरवावी व संगणक/प्रक्षेपण यंत्राद्वारे सादरीकरण करावे. समिती त्यानुसार आपली कार्यवाही करील.

२. प्रवासभत्ते बिल विभाग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.



Scanned with ACE Scanner